**दिनांक २८/०७/२०२०**

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक सय्यद शौकत अली साबीर अली, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे शिल्लेगाव, औरंगाबाद ग्रामीण यांनी ३०,०००/- रु लाचेची मागणी केल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | सय्यद शौकत अली साबीर अली, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे शिल्लेगाव, औरंगाबाद ग्रामीण.<br>रा. सिल्कमील कॉलनी, रेल्वेस्टेशन जवळ, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे शिल्लेगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद गु.र.न. ०२११/२०२०, कलम भ्र. प्र. अधि. १९८८ (सुधारणा २०१८) -७, भा.दं.वि कलम -२०१, माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ कलम -६५, ४३ (अ), (डी). दि.२८/०७/२०२० |
| लाच मागणी रक्कम | :- | ३०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार हे त्यांचा ४०७ टेम्पो हे वाळु वाहतुकीसाठी वापरतात व त्यासाठी पोलीस लोकेशन देणारे मुलांवर सीआरपीसी १०९ प्रमाणे कारवाई न करण्यासाठी ३०,०००/- रु लाचेची मागणी केली होती. या तक्रारीस अनुसरून कारवाई दरम्यान नमुद पोलीस निरीक्षक यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन, त्यामधील लाचमागणी दरम्यान झालेले संभाषण डिलीट करून, सदरच्या मेमरी कार्डला पाठीमागील बाजूस ईलेक्ट्रॉनिक चिपला ओरखडे (scrach) मारुन पुरावा नष्ट केला व सरकारी मालमत्ता मेमरी कार्ड निकामी केले. |
| लाच मागणी ठिकाण | :- | पोलीस ठाणे शिल्लेगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद येथे |
| सापळा अधिकारी | :- | श्री. राजकुमार पाडवी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड |
| तपासी अधिकारी | | श्री. मारुती पंडित, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे त्यांचा ४०७ टेम्पो हे वाळु वाहतुकीसाठी वापरतात व त्यासाठी पोलीस लोकेशन देणारे मुलांवर सीआरपीसी १०९ प्रमाणे कारवाई न करण्यासाठी पोलीस स्टेशन शिल्लेगाव, ता गंगापुर येथील पोलीस निरीक्षक सय्यद हे ३०,०००/- रु लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने कारवाई दरम्यान, सय्यद, पोलीस निरीक्षक यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन, त्यामधील लाचमागणी दरम्यान झालेले संभाषण डिलीट करून, सदरच्या मेमरी कार्डला पाठीमागील बाजूस ईलेक्ट्रॉनिक चिपला ओरखडे (scrach) मारुन पुरावा नष्ट केला व सरकारी मालमत्ता मेमरी कार्ड निकामी केले. त्यामुळे त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे शिल्लेगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद येथे गु.र.न. ०२११ /२०२० कलम भ्र. प्र. अधि. १९८८ (सुधारणा २०१८) -७, भा.दं.वि कलम -२०१, माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ कलम -६५, ४३ (अ), (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.श्री.अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, ला.प्र.वि., औरंगाबाद, पोलीस उपअधीक्षक श्री. हनपुडे पाटील, ला.प्र.वि. बीड युनिट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री राजकुमार पाडवी, ला.प्र.वि. बीड युनिट यांनी केली आहे. त्यांना पोनि श्री. रवींद्र परदेशी, पोना हनुमंत गोरे, राजेश नेहरकर, पोशि मनोज गदळे, प्रदीप वीर, चापोशि गणेश म्हेत्रे, ला.प्र.वि. बीड युनिट यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.